
सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ६ मे २०२६

आतील पानावर

पान २– तब्बल ३३ वर्षांनंतर 'खलनायक रिटर्न्स'
पान ३– राजकुमार हिराणींच्या '३ इडियट्स'चा...
पान ४– सारा अर्जुनला मिळाला बायोपिक?
पान ५– तो अध्याय संपला...
पान ७– यशच्या 'टॉक्सिक'चं प्रदर्शन टळलं

# विकीचा 'महावतार'साठी खास प्लॅन






'छावा' चित्रपटातील छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेनंतर विकी कौशल आता एका मोठ्या पौराणिक भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अमर कौशिक दिग्दर्शित 'महावतार' या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा आहे. भगवान विष्णूंचे सहावे अवतार मानल्या जाणार्या 'परशुराम' यांची कथा या चित्रपटात पाहायला मिळणार असून, या भूमिकेसाठी विकीने आपली सर्व ताकद पणाला लावल्याचे दिसत आहे. 'महावतार' ही केवळ एक फिल्म नसून विकी कौशलसाठी तो एक ड्रीम प्रोजेक्ट आहे. पिंकविलाने दिलेल्या वृत्तानुसार, या भूमिकेला पूर्ण न्याय देण्यासाठी विकीने स्वतःवर तब्बल १८ महिने काम करणार आहे.

विशेष म्हणजे, या काळात तो कोणताही नवीन चित्रपट स्वीकारणार नाही. पात्राची गंभीरता आणि भव्यता पाहता विकीने हा मोठा त्याग करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या विकी कौशल संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटाच्या शुटिंगमध्ये व्यस्त आहे. या चित्रपटातील गाण्यांचे शूटिंग सध्या सुरू असून, हे काम पूर्ण होताच विकी पूर्णपणे 'महावतार'च्या तयारीला लागेल. विकीच्या या ट्रान्सफॉर्मेशनसाठी सुमारे ६ महिने लागतील. दिग्दर्शक अमर कौशिक यांनी विकीसाठी एक विशेष 'मॉड्यूल' तयार केले आहे. यामध्ये केवळ शारीरिक बदलच नाही, तर परशुरामांच्या पात्रातील मानसिक आणि भावनिक पैलूंचा अभ्यास करण्यासाठी विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. 'महावतार'चे भव्य शुटिंग हे जानेवारी २०२७ मध्ये सुरू होण्याची शक्यता आहे. चित्रपटाची तयारी, व्हीएफएक्स आणि विकीचा लूक यावर सध्या वेगाने काम सुरू आहे. हा चित्रपट डिसेंबरमध्ये चित्रपटगृहात धडकण्याची दाट शक्यता आहे. 'स्त्री २' सारखा चित्रपट देणारे दिग्दर्शक अमर कौशिक आणि विकी कौशल यांची जोडी पहिल्यांदाच एकत्र येत आहे.

# तब्बल 33 वर्षांनंतर 'खलनायक रिटर्न्स'

बॉलिवूड तब्बल ३३ वर्षांपूर्वी आलेल्या 'खलनायक' या कल्ट क्लासिक चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. या चित्रपटातील अभिनेता संजय दत्तच्या अभिनयाने चाहत्यांना वेड लावले आणि त्याला 'खलनायक' ही कायमची ओळख मिळाली. आता तोच 'बल्लू' ३३ वर्षांनंतर पुन्हा एकदा जेलमधून फरार होऊन दहशत पसरवण्यासाठी परतला आहे. नुकताच 'खलनायक रिटर्न्स'चा फर्स्ट लूक टीझर समोर आला असून, यामध्ये संजय दत्त अत्यंत क्रूर आणि थरारक लूकमध्ये पाहायला मिळत आहे. संजय दत्तने सोशल मीडियावर 'खलनायक रिटर्न्स'चे दोन पोस्टर्स शेअर केले आहेत. पहिल्या पोस्टरमध्ये संजय दत्त एकटक पाहत सिगार पेटवताना दिसत आहे आणि त्याच्या हातात आग लागलेली आहे. दुसऱ्या पोस्टरमधील त्याचे भयानक हास्य खरोखरच अंगावर काटा आणणारे आहे. फोटो शेअर करून संजय दत्तने हटके कॅप्शनमध्ये लिहिले, प्रत्येक कथेची एक वेळ असते आणि तिची वेळ आली आहे. खलनायक रिटर्न्स. टीझरसोबतच संजय दत्तने चित्रपटाचे दोन पोस्टर्सही शेअर केले आहेत. एका पोस्टरमध्ये तो सिगार पेटवताना दिसत आहे, तर दुसऱ्या पोस्टरमधील त्याचे भीषण हास्य अंगावर शहारे आणणारे आहे. पोस्टर्स शेअर करताना संजयने लिहिले की, प्रत्येक कथेची एक वेळ असते आणि आता त्याची वेळ आली आहे. खलनायक रिटर्न्स. जिओ स्टुडिओजने आपल्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर 'खलनायक रिटर्न्स'चा छोटा टीझर प्रदर्शित केला आहे. टीझरमध्ये एक माणूस रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसत असून, त्यानंतर हातात बेड्या असलेल्या संजय दत्तची दमदार एंट्री होते. आपली सिगार पेटवत तो घोगऱ्या आवाजात म्हणतो, बोला था ना १० ऑक्टोबर, रात के १० बजे बल्लू जेल से फुर्र...नायक नहीं, खलनायक हूं मैं। हा टीझर पाहून चाहते कमालीचे उत्साही झाले आहेत. 'धुरंधर २' नंतर जिओ स्टुडिओजचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसचे सर्व रेकॉर्ड मोडेल, अशी चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. मात्र 'खलनायक रिटर्न्स' ची अद्याप रिलीज डेट अधिकृतपणे जाहीर झाली नाही. १९९३ मध्ये सुभाष घई यांच्या दिग्दर्शनाखाली मूळ 'खलनायक' प्रदर्शित झाला होता, ज्यामध्ये संजय दत्तसोबत माधुरी दीक्षित आणि जॅकी श्रॉफ मुख्य भूमिकेत होते. 'खलनायक रिटर्न्स' मध्ये संजू बाबाच्या विरोधात कोणती अभिनेत्री असणार, हे मात्र अजूनही गुलदस्त्यात आहे.



# अक्षय खन्नाच्या तालचा सीक्वेल येणार?



भारतीय बॉलीवूड चित्रपटसृष्टीमध्ये आणि चित्रपट गाजले त्याचे सिक्वेल सुद्धा आले आहे. आज काल अनेक चित्रपटांचे सिक्वेल येत आहेत. धुरंधर २, बॉर्डर टू, आला तर खलनायक या चित्रपटाच्या सिक्वेलची घोषणा करण्यात आली आहे. आणि आता दिग्दर्शक सुभाष घई यांनीही त्यांच्या सुपरहिट चित्रपट 'ताल'च्या सिक्वेलची घोषणा केली आहे. तर तर, सुभाष घई यांनी इन्स्टाग्रामवर अक्षय खन्ना आणि अनिल कपूर यांच्या 'ताल' चित्रपटाचा एक फोटो शेअर केला होता. त्यासोबत त्यांनी लिहिले, जर ताल २ बनवला तर आवडेल का? आणि ती पुन्हा तितकीच अविस्मरणीय ठरू शकेल का? हे प्रश्न माझ्या मनात आहेत. असे त्यांनी या पोस्टमध्ये लिहिले आहे. ताल हा चित्रपट चित्रपटसृष्टीमधील लोकप्रिय चित्रपट आहे. या चित्रपटाने प्रेक्षकांची मने जिंकली होती त्यामुळेच सुभाष घई यांनी एका मुलाखतीत म्हणले की, मी माझ्या पोस्टमध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर प्रेक्षकच देतील. गेल्या १५ वर्षांपासून लोक मला विचारत आहेत की मी 'ताल' पुन्हा कधी बनवणार. तर ते पुढे म्हणाले त्यावेळी 'ताल' बनवला गेला, तेव्हा अक्षय खन्ना आणि ऐश्वर्या राय बच्चन नवोदित होते, तर अनिल कपूर एक स्टार म्हणून ओळखले जात होते तर योग्य कलाकार आणि आणि कथा या दोन्हीची उत्तम प्रकल्पासाठी गरज असते. 'ताल' हा चित्रपट १९९९ मध्ये प्रदर्शित झाला होता. तर या चित्रपटाने त्या काळात प्रचंड लोकप्रियता मिळवली. आणि आज हि या चित्रपटाला प्रेक्षक विसरले नाहीत. त्यातील कथा, गाणी , आणि कलाकारांचा अभिनय आजही प्रेक्षकांच्या मनात आहे. आता 'ताल २' बद्दल चर्चा वाढत असल्याने, चाहत्यांना आशा आहे की हा सिक्वेल पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या हृदयाला स्पर्श करेल.

# ५२ ब्ल्यू'मध्ये नेहा धूपिया



अभिनेत्री नेहा धूपिया सध्या स्वत:चा आगामी चित्रपट ५२ ब्ल्यू'वरून चर्चेत आहे. या चित्रपटाद्वारे ती हॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांनी याचा लुक आणि ट्रेलर जारी केला आहे. नेहा यात एका वेगळ्या लुकमध्ये दिसून येत आहे. हा चित्रपट फीफा वर्ल्ड कप २०२२ ची पार्श्वभूमीत एका भारतीय स्थलांतरित कामगाराच्या आयुष्यावर आधारित आहे. नेहाने यात लियोनेस मेस्सीचा मोठा चाहता असलेल्या इसमाच्या (यादव शशीधर) आईची भूमिका साकारली आहे. हा इसम मेस्सीला भेटण्यासाठी विदेशात जातो, जेथे तो अडकून पडतो. भारतात आशीषचा परिवार प्रथम तो विदेशात जाणार असल्याने आनंदी होतो, परंतु तो जेव्हा परत येत नाही, तेव्हा परिवार त्रस्त होतो. मुलगा दूर झाल्याने त्याची आई चिंतातुर असल्याचे ट्रेलरमध्ये दाखविण्यात आले आहे. या चित्रपटात नेहाच्या पतीची भूमिका आदिल हुसैन साकारत आहे. चित्रपटाचे चित्रिकरण प्रामुख्याने कोची येथे पार पडले आहे. हा चित्रपट इजिप्तचे फिल्ममेकर अली अल-अरबी यांच्या दिग्दर्शनात तयार झाला आहे. नेहा धूपियाने २००३ साली 'कयामत' चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. तर यापूर्वी ती अखेरची 'बॅड न्यूज २०२४'मध्ये दिसून आली होती. आता ती हॉलिवूडपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# कृतिकाला कोणावर अवलंबून राहायचं नाही!



टीव्हीपासून वेब सिरीजपर्यंत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री कृतिका कामरा सध्या पुन्हा चर्चेत आहे. नुकतीच तिची 'मटका किंग' ही सिरीज प्रदर्शित झाली असून तिच्या लग्नाचीही जोरदार चर्चा सुरू आहे. तिने अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत तिच्या करिअर आणि वैयक्तिक आयुष्याबद्दल मोकळेपणाने संवाद साधला. कृतिका कामराने ३७ व्या वर्षी गौरव कपूरसोबत लग्न केलं. उशिरा लग्न केल्याबद्दल ती म्हणते की, लहान वयात लग्न न केल्याचा मला खूप आनंद आहे. त्या वयात आपली विचारसरणी पूर्ण विकसित झालेली नसते. ती सांगते की, तिच्या कुटुंबाने कधीही लग्नासाठी दबाव टाकला नाही.

तिच्या आई-वडिलांनी मुलगा आणि मुलगी असा भेदभाव न करता दोघांनाही समान संधी दिली. प्रेम आणि नात्यांविषयी तिचा दृष्टिकोनही काळानुसार बदलला आहे. ती म्हणते की, टीनएजमध्ये आपण चित्रपट आणि गाण्यांमुळे खूप रोमँटिक विचार करतो. पण वयानुसार अनुभव वाढतात आणि आपण वास्तव समजू लागतो. २० ते ३० या वयात तिने स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे ओळखलं. मी कोण आहे, मला काय हवं आहे आणि माझ्या आयुष्यातील प्राधान्य काय आहेत, हे मला समजलं, असं ती सांगते. गौरव कपूरसोबतच्या नात्याबद्दल बोलताना कृतिका म्हणते की, दोघेही स्वतंत्र आणि स्वतःच्या कष्टावर उभे राहिलेले आहेत. मी भावनिक आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहे. मला कोणावर अवलंबून राहण्याची गरज नाही, असं ती स्पष्टपणे सांगते. लग्नानंतर आयुष्यात फारसा बदल जाणवला नाही, असंही ती नमूद करते. कृतिका एका छोट्या शहरातून आली आहे. तिच्या कुटुंबाचा फिल्म इंडस्ट्रीशी काहीही संबंध नव्हता. तिची आई प्राचार्य आणि वडील डॉक्टर आहेत. अशा पार्श्वभूमीतून मुंबईत येऊन अभिनय क्षेत्रात करिअर करणं तिच्यासाठी मोठं पाऊल होतं. तरीही तिने धाडस दाखवत या क्षेत्रात स्वतःची जागा निर्माण केली.

टीव्ही इंडस्ट्रीत यशाच्या शिखरावर असताना तिने अचानक ते क्षेत्र सोडून फिल्म आणि वेब सिरीजकडे वळण्याचा मोठा निर्णय घेतला. त्या वेळी अनेकांनी हा निर्णय चुकीचा असल्याचं सांगितलं होतं. पण कृतिकाने धोका पत्करला आणि आज ती वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिकांमुळे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. तिच्या प्रेरणेबद्दल विचारलं असता कृतिका सांगते की, जीनत अमान तिची आयकॉन आहे. त्यांच्या कामाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा तिच्यावर मोठा प्रभाव आहे. कृतिकाच्या मते, जीनत अमान यांनी नेहमीच वेगळ्या वाटेवर चालत स्वतःची ओळख निर्माण केली. आज कृतिका कामरा आपल्या मेहनतीच्या जोरावर इंडस्ट्रीत स्थिरावली आहे आणि पुढेही वेगळं आणि दर्जेदार काम करण्यासाठी ती सज्ज आहे.

# राजकुमार हिराणींच्या '३ इडियट्स'चा सिक्वेल येतोय



अलीकडे काही गाजलेल्या बॉलीवूड चित्रपटांचे सिक्वेल येत आहेत. अशा अनेक चित्रपटांची चर्चा सुरू आहे. अशीच काही दिवसांपूर्वी आमिर खानच्या '३ इडियट्स'च्या सिक्वेलबाबत चर्चा सुरू झाली होती. अशातच '३ इडियट्स'च्या सिक्वेलवर स्वत: आमिर खाननेच प्रतिक्रिया दिली आहे. २००९ मधील ब्लॉकबस्टर चित्रपट '३ इडियट्स'चा सिक्वेल लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे, एका मुलाखतीदरम्यान आमिर खानने माहिती दिली. या चित्रपटाचे काम सध्या सुरू असल्याचे त्याने स्पष्ट केले. तसेच त्याने कथा काय असणार आणि कलाकारांबद्दलही सांगितले. आमिर म्हणाला, सध्या '३ इडियट्स'च्या सिक्वेलवर काम सुरू आहे. मी या कथा ऐकली असून ती खूपच छान आहे. संहितेवर अजून थोडे काम बाकी आहे, पण मूळ कथा अतिशय उत्तम आहे. पहिल्या भागाप्रमाणेच यातही विनोद आणि एक आगळीवेगळी कथा पाहायला मिळेल. ही '३ इडियट्स'चीच गोष्ट असेल, पण ती १० वर्षांनंतरच्या काळावर आधारित असेल. यापुढे आमिर म्हणाला, हा असा एक चित्रपट आहे; ज्यावर मी लवकरच काम सुरू करणार आहे. अभिजात जोशी आणि राजू हिराणी यांनी ही कथा खूप सुंदर लिहिली आहे. चित्रपटाचे चित्रीकरण कधी सुरू होईल याची नेमकी तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. तसेच चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला कधी येणार, याबद्दलची माहितीही समोर आलेली नाही. पण आमिरच्या आगामी चित्रपटांच्या यादीत हा चित्रपट अग्रस्थानी असेल. या सिक्वेलमध्ये आमिर खानसह आर. माधवन, शर्मन जोशी आणि करीना कपूर ही मूळ कलाकार मंडळी पुन्हा एकत्र दिसण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये शर्मन जोशीने या चित्रपटाच्या सिक्वेलबद्दल आपली इच्छा व्यक्त केली होती. तो म्हणाला होता, अनेक वेळा '३ इडियट्स'च्या सिक्वेलची चर्चा झाली, पण मागच्याच्या वेळी ती चर्चा फक्त एका जाहिरातीसाठी झाली होती. आशा आहे की यावेळी ही बातमी खरी ठरेल. दरम्यान, २००९ मधील '३ इडियट्स' या चित्रपटातून शिक्षण व्यवस्थेबद्दल एक वेगळा दृष्टिकोन मांडण्यात आला होता. अशातच आता याचा सिक्वेल येणार आहे, ज्याची सर्व चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत.



# 'पूजा हेगडे'च्या रिलेशनशिपच्या चर्चा!

अभिनेत्री पूजा हेगडे सध्या तिच्या आगामी 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. ती सध्या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान, ती तिच्या लव्ह अफेर मुळे चांगलीच चर्चेत आहे. बऱ्याच काळापासून या अभिनेत्रीचे नाव दिवंगत अभिनेते विनोद मेहरा यांचा मुलगा 'रोहन मेहरा'सोबत जोडले जात आहे. आता त्यांच्या नात्याला दुजोरा मिळाला आहे. पूजा हेगडे गेल्या काही वर्षांपासून अभिनेता रोहन मेहरासोबत रिलेशनशिपमध्ये आहे. गेल्या वर्षभरात हे जोडपे अनेक कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसले आहे, ज्यामुळे ते एकमेकांना डेट करत असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. त्यांचे अनेक फोटो देखील सोशलवर व्हायरल झाले आहेत. हे लक्षात घेण्यासारखे आहे की पूजा तिचे डेटिंग आयुष्य खाजगी ठेवणे पसंत करते. 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटाच्या प्रदर्शनावेळी सलमान खान आणि पूजा हेगडे यांच्या डेटिंगच्या अफवा देखील चर्चेत होत्या, पण त्या केवळ अफवा होत्या. रोहन मेहराबद्दल बोलायचे झाल्यास, या अभिनेत्याने २०१८ मध्ये 'बाजार' या चित्रपटातून अभिनयात पदार्पण केले, ज्यात सैफ अली खान मुख्य भूमिकेत होता. या चित्रपटात त्याने राधिका आपटे आणि चित्रांगदा सिंग यांच्यासोबतही काम केले होते. हा अभिनेता दिवंगत विनोद मेहरा यांचा मुलगा आहे. रोहनने संजय लीला भन्साळी यांच्या 'बाजीराव मस्तानी' या चित्रपटात सहाय्यक दिग्दर्शक म्हणूनही काम केले आहे. तर दुसरीकडे, पूजाच्या आगामी चित्रपटांबद्दल बोलायचे झाल्यास, ती लवकरच वरुण धवन आणि मृणाल ठाकूर यांच्यासोबत 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटात दिसणार आहे. डेव्हिड धवन या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. हा चित्रपट २२ मे रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. पूजाकडे 'डीक्यू ४१', 'कांचना ४' आणि 'जना नायकन' यांसारखे चित्रपटही आहेत. पूजाचा सोशल मीडियावर मोठा चाहता वर्ग असून, इंस्टाग्रामवर देखील लाखोंच्या घरात फॉलोवर्स आहेत.



# अक्षय कुमार व विद्या पुन्हा एकत्र दिसणार

अक्षय कुमार गेल्या काही दिवसांपासून मोठ्या चर्चेत आहे. त्याच्या भूत बंगला या सिनेमाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सिनेमाने जगभरात १०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. प्रियदर्शन दिग्दर्शित या सिनेमात अक्षय कुमारसह अरसानी, राजपाल यादव, वामिका गब्बी, मिथिला पालकर, तब्बू हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांत आहेत. या सिनेमातील कॉमेडी प्रेक्षकांना आवडत असल्याचे दिसत आहे. याबरोबरच, अक्षय कुमारने विविध मुलाखतींमध्ये केलेली वक्तव्येदेखील सध्या चर्चेत आहेत. आता मात्र अक्षय कुमार एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. अभिनेत्री विद्या बालन व अक्षय कुमार पुन्हा एकदा दिसणार आहेत. ही जोडी पुन्हा एकदा पडद्यावर धुमाकूळ घालण्यासाठी सज्ज आहे. अन्नीस बज्मींच्या पुढील प्रोजेक्टमध्ये ही जोडी दिसणार आहे. अक्षयने त्याच्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला. या व्हिडीओमध्ये पाहायला मिळते की अक्षय कुमार विद्या बालनबरोबर विमानात चढताना दिसत आहे. यावर समजते की तो अभिनेत्रीसह केरळला शूटिंगसाठी गेला आहे. अक्षयने हा व्हिडीओ शेअर करत लिहिले, पुढचा स्टॉप: देवभूमी. केरळ. अन्नीस बज्मींचा पुढचा चित्रपट हा माझा विद्या बालनबरोबरचा चौथा सिनेमा असेल. आमच्या जोडीला मिळालेले यश तसेच राहो. अभिनेत्याच्या या पोस्टवर अनेकांनी कमेंट केल्या आहेत. तसेच, या जोडीला पुन्हा एकदा एकत्र पाहण्यासाठी उत्सुक असल्याचे कमेंटमध्ये लिहिले आहे. याआधी अक्षय कुमार आणि विद्या बालन यांनी हे बेबी, मिशन मंगल आणि भूल भुलैय्या या सिनेमांत एकत्र काम केले आहे. त्यांच्या या तिन्ही सिनेमांना प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले आहे. आता या सिनेमाचे काय नाव आहे, हा सिनेमा कधी प्रदर्शित होणार, अक्षय व विद्या यांच्यासह कोणते कलाकार असणार याबद्दल कोणतीही माहिती समोर आली नाही. आता याबद्दल कधी खुलासा होणार, कोणत्या जॉनरचा सिनेमा असणार हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. दरम्यान, अक्षयच्या भूत बंगला या सिनेमाला प्रेक्षकांचे प्रेम मिळत असून विद्या बालनदेखील राजा शिवाजी या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे.



# सारा अर्जुनला मिळाला बायोपिक?

सारा अर्जुन सध्या धुरंधर २ चित्रपटाच्या यशाला अनुभवत आहे. अभिनेत्रीने चित्रपटात यलीना ही भूमिका साकारली होती. तर अभिनेत्रीला आता एक मोठा प्रोजेक्ट मिळाला आहे. सारा अर्जुन लवकरच एका चित्रपटात मधुबाला यांची व्यक्तिरेखा साकारणार असल्याची चर्चा आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन जसमीत रीन करणार असून संजय लीला भन्साळी यार्चे निर्माते असणार आहेत. चित्रपट सध्या निर्मितीपूर्व स्थितीत असू चालू वर्षाच्या अखेरपर्यंत याचे चित्रिकरण सुरू होऊ शकते. हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णयुगाला जिवंत करत सर्वांसमोर आणणे आणि मधुबाल यांचे जीवन तसेच कारकीर्दीला एक भव्य सिनेमाई श्रद्धांजलीच्या स्वरुपात दर्शविणे या प्रोजेक्टचा उद्देश आहे. मधुबाला यांची व्यक्तिरेखा साकारण्यासाठी सारा अर्जुनला फिजिकल ट्रान्सफॉर्मेशनवर खूप काम करावे लागणार आहे. मधुबाला यांच्याबद्दलचे आकर्षण प्रामाणिक स्वरुपात चित्रित करण्यासाठी साराला मोठी मेहनत करावी लागणार आहे. कॉस्ट्यूम डिटेलिंगपासून डायलेक्ट ट्रेनिंगपर्यंत निर्माते त्या युगातील अचुकतेला पुनर्जीवित करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. दिग्दर्शक जस्मी रीन यांना डार्लिंग्स यासारख्या चित्रपटांसाठी ओळखले जाते. या इंटेंस ड्रामासाठी दिग्दर्शक मधुबाला यांचे यश आणि इमोशनल स्ट्रगल दोन्ही गोष्टींना पडद्यावर आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. चित्रपट निर्मात्यांनी प्रोजेक्टशी निगडित अनेक माहिती सध्या गुप्त ठेवली आहे.

# सिद्धार्थ दिसणार शाहीदच्या 'इश्क विश्क' सिनेमात

सिद्धार्थ जाधव हा मराठी सिनेसृष्टीतील हरहुन्नरी अभिनेता. मध्यमवर्गीय घरातून आलेल्या सिद्धार्थने अभिनय आणि टॅलेंटच्या जोरावर कलाविश्वात स्थान मिळवलं. काही हिंदी सिनेमांमध्येही तो झळकला. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत सिद्धार्थने कलाविश्वातील त्याचा ह्रा प्रवास सांगितला. यावेळी शाहिद कपूरच्या 'इश्क विश्क' सिनेमात झळकल्याचा खुलासाही प्रेक्षकांच्या लाडक्या सिद्धूने केला आहे. सिद्धार्थ एका मुलाखतीत म्हणाला, सुपरस्टार हा रिएलिटी शो आला होता ज्याचं होस्टिंग चंकी पांडे सर करत होते. त्या शोमध्ये अभिनय, डान्स, गायन असं सगळंच करायचं होतं. मी माझ्या मित्रासोबत त्या शोमध्ये ऑडिशन द्यायला गेलो होतो. मी त्या शोचा मेगा फायनलचा विनर होतो. तो शो जिंकणारी व्यक्ती अभिनय करणार असेल तर त्याला Tir चा सिनेमा. सिंगर असेल त्याला जतिन भाईसोबत गाण्याची संधी. आणि जो डान्सर असेल त्याला राजू सरांसोबत कोरिओग्राी...अशी बक्षीसे होती. शाहीद कपूरचा जो इश्क विश्क सिनेमा आहे. त्यातील एका गाण्यात मी झळकलो आहे. त्या गाण्यात शाहीद कपूरच्या बाजूला त्याचे काही मित्र दिसतात. त्यामध्ये लाल रंगाची टोपी आणि डंगरीमध्ये एक वेटर दिसतो. तो मी आहे सिद्धार्थ जाधव. केन घोष सरांनी तो सिनेमा दिग्दर्शित केला होता. सिनेमात चांगली भूमिका देतो असं ते म्हणाले होते. पण पुढे ते शक्य झालं नाही. सध्या सिद्धार्थ मटका किंग या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. सिद्धार्थने या सीरिजमध्ये विजय वर्मासोबत स्क्रीन शेअर केली असून महत्त्वाची भूमिका साकारली आहे. ॲनिमल या नाटकातूनही सिद्धार्थ प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. या नाटकातून सिद्धार्थने रंगभूमीवर पदार्पण केलं आहे.






# 'वेडात मराठे वीर दौडले सात' चित्रपट रखडला

बॉलिवूडचा खिलाडी अक्षय कुमार ज्या चित्रपटातून मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करणार होता, तो 'वेडात मराठे वीर दौडले सात' आता प्रदर्शनापूर्वीच संकटात सापडला आहे. दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या या महत्त्वाकांक्षी चित्रपटाचे शूटिंग आर्थिक अडचणींमुळे थांबवण्यात आल्याची माहिती आहे. या चित्रपटात अक्षय कुमार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भूमिकेत दिसणार होता. २०२२ मध्ये मोठ्या थाटामाटात जाहीर झालेला हा चित्रपट सात मराठा वीरांच्या शौर्यावर आधारित होता. मात्र, वाढता निर्मिती खर्च आणि निर्मात्यांसमोरील आर्थिक पेच यामुळे सध्या तरी या चित्रपटाचे भवितव्य धोक्यात आले असून शूटिंग अर्धवट राहिले आहे. या चित्रपटातील कलाकारांचे फर्स्ट लूक देखील रिलीज करण्यात आले होते. चित्रपटाची भव्यता, महेश मांजरेकर यांचं दिग्दर्शन आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी यामुळे या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत होते. मात्र आता आर्थिक कारणास्तव चित्रपट रखडला आहे. वाढता निर्मिती खर्च आणि चित्रपट पूर्ण होण्यास लागणारा वेळ यामुळे हा चित्रपट पूर्ण करणं निर्मात्यांसाठी कठीण झालंय. महेश मांजरेकर दिग्दर्शित, वसीम कुरेशी निर्मित 'वेडात मराठे वीर दौडले सात' या चित्रपटात कलाकारांची मांदियाळी असेल, असं जाहीर करण्यात आलं होतं. या चित्रपटात जय दुधाणे, उत्कर्ष शिंदे, विशाल निकम, विराट मडके, हार्दिक जोशी, सत्या मांजरेकर, अक्षय कुमार, नवाब खान आणि प्रवीण तरडे हे कलाकार महत्त्वाच्या भूमिका साकारणार होते.

# तो अध्याय संपला...



लोकप्रिय शास्त्रीय गायक राहुल देशपांडेने गेल्या वर्षी सोशल मीडियावर घटस्फोटची घोषणा केली होती. त्यानंतर सर्वांनाच मोठा धक्का बसला होता. असं का झालं? नक्की काय घडलं असेल? असे प्रश्न चाहत्यांच्या मनात होते. आता नुकतंच राहुलने पहिल्यांदाच त्या पोस्टवर भाष्य केलं आहे. सोशल मीडियावर ही घोषणा करण्याची गरज का वाटली? याचं उत्तर त्याने दिलं. 'हा अध्याय संपला...' असं तो यावेळी म्हणाला. एका मुलाखतीत राहुल म्हणाला, मला वाटतं मी एक कलाकार आणि माणूस म्हणून अतिशय प्रामाणिक आहे. मी याआधी रेणुका आणि नेहासोबतचे अनेक फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत. त्यामुळे मला फॉलो करणारे, माझे चाहते यांना सांगणं ही माझी जबाबदारी आहे. हा अध्याय संपला एवढंच सांगायचा त्यामागे हेतू होता. नाहीतर आम्ही कुठेही बाहेर गेलो की आमच्या तिघांचे फोटो असायचे. मोजके फोटो मी सोशल मीडियावर पोस्ट करायचो. मग जर हा अध्याय संपलाय तर ते सोशल मीडियावर सांगणं मला गरजेचं वाटतं. त्यामागे दुसरा काहीही हेतू नव्हता. राहुल पुढे म्हणाला, आमचे संबंध आजही चांगलेच आहेत. आम्ही रेणुकाचे आईवडील आहोत आणि कायम राहू. आताही मी रेणुकाची पोस्ट टाकली होती त्यात नेहाही होती. नेहानेही पोस्ट केली त्यात मी होतो. एखादा अध्याय संपल्यानंतर कशी तुझी चूक होती, माझी नव्हती असं आपण म्हणतो असं काही नाही. आपण ते नातं मागे सोडून आयुष्यात एक व्यक्ती म्हणून पुढे जाऊच शकतो. हे काही मुद्दामून होत नाही. त्याला विविध कारणं असतात. यात तुमचीही चूक असते. तुम्हाला वाटतं समोरच्याची तर त्याचीही चूक असते. कायम याच्या दोन बाजू असतात. आपण उगाचच याचा बाऊ करतो. या पोस्टनंतर मला अनेक फोन आले. पण मी एकही फोन घेतला नाही. मला कोणाशी बोलायचंच नव्हतं. हा माझा वैयक्तिक विषय होता. नेहाला त्रास झाला. रेणुकाला तर खूप जास्त त्रास झाला. पण ही माझी खाजगी गोष्ट असली तरी हे कोणाच्याही आयुष्यात होऊ शकतं. यामुळे दोन्ही व्यक्ती वाईट ठरत नाहीत. कोणाची चूक आहे आहे, हा असाच आहे, याला अक्कलच नाही, याचं कुठेतरी बाहेर लफडं असेल या असल्या गोष्टींना काही अंत नाही.



# विनोदाचे बेताब बादशहाः मेहमूद

'हम काले है तो क्या हुआ दिलवाले है' दाक्षिणात्य रसोईया, गुडघ्यापासून दुमडून कमरेला खोचलेली लुंगी, पट्ट्यापट्ट्याचा टी-शर्ट, डोक्यावर छपरासारखे पूर्ण व कपाळ अर्धे झाकलेला विग या अवतारात हेलनसोबत स्वप्न नृत्य सादर करणारे मेहमूद अफलातून व्यक्तिमत्त्व आहे.

१९५८ ' 'खयालो में- हंगामा- कहाँ भाग रही तू रे क्या हुआ? काले से डर गयी क्या?' वरील संवाद हैदराबादी हिंदीत दाबून म्हणताना गाणे सुरू होते. ते कृष्णवर्णीय असल्याने न्यूनगंडामुळे प्रत्यक्ष प्रेम प्रकट करू शकले नाही. हेलनचा पदन्यास एकूणच विलोभनीय होता. गाण्याच्या शेवटी पुन्हा हैदराबादी संवाद... 'क्या छमक रही, पीछे नहीं हटुंगा मै, छोडुंगा नही' सर्वदर्शन संग्रहातही विनोदी भूमिकेचे महत्त्व आहे. 'प्यार की आग में तनबदन जल गया' १९६४ सालच्या 'जिद्दी' चित्रपटात शुभा खोटेच्या प्रेमात वेडे झालेले मेहमूद यांच्या मार्गात सासरेबुवा धुमाळ जागोजाग येतात.

'मै रंगीला प्यार का राही...' १९५९ सालच्या 'छोटी बहेन' चित्रपटातील हे गाणे मेहमूद व शुभा खोटे यांच्यावर चित्रित आहे. सुबीरसेन व लता यांनी गायलेल्या जा सुश्राव्य गीताला या दोघांनी रोमँटिक अंदाजात सादर केले. 'ओ मामा ओ मामा ओ मामा मामा मामा...' १९५८ च्या 'परवरीश' चित्रपटात रफी व मन्ना डे यांच्या स्वरात मामा (राधाकिशन) भोवती फेर धरून मेहमूद व राज कपूर अतिशय सुंदर विनोदप्रचूर पण शास्त्रीय पद्धतीने नृत्य सादर करतात. दुनियेतील असली व नकली चेहऱ्याची ओळख पटवतात. 'मतवाली आंखोवाले ओ अलबेले दिलवाले...' १९६१ च्या 'छोटे नवाब' या स्वतःच्या प्रॉडक्शनच्या पहिल्या चित्रपटातील हेलनसोबतचा हा नृत्याभिनय मेहमूद यांनी खूपच मनोवेधक अभिनित केला. रॉक अँड रोल नृत्यशैलीतील या गाण्यातील प्ले बॉय मेहमूद यांच्या संथ लयीतील हेलनसोबतचा पदन्यास अगदी सहज व चपखल होता. 'रिक्षे मे मेरे तुम आ बैठो अब मेरा हुनर देखो...' १९६२ सालच्या 'दिल तेरा दिवाना' चित्रपटात दाक्षिणात्य लुंगी व टी-शर्ट अवतारात प्रेयसीला रिक्षाची सफर घडवितानाचा विनोदी प्रसंग स्टेजवर सादर केला. मेहमूदच्या ट्विस्ट नृत्य प्रकाराने रंगत भरली 'एक चतुर नार कर के सिंगार...' १९६८ सालच्या 'पडोसन'मधील या गाण्यातील विनोदी शब्द व मेहमूद यांचे दाक्षिणात्य टोनिंगमधील भाष्य यामुळे या गाण्यात हास्याचे अक्षरशः फवारे उडाले आहे.

दाक्षिणात्य गवय्याच्या अवतारात हातात पेटी घेऊन खिडकीजवळ येतात व 'नाच न जाने आंगन तेढा' म्हणून जमिनीवर लोळून दोन- तीन वेळा सैरावैरा अवस्था प्रदर्शित करतात. तिकडे किशोर कुमार त्यांना घोडा म्हणतात. त्यावर- फिर गडबड, घोडा बोला! घोडा चतुर, घोडा चतुर, क्या जी! चतुर बोल या घोडा बोल. या विनोदी गाण्याचा प्रसंग पूर्णतः शब्दात मांडणे अवघड. एक मात्र खरे की, भारतीय चित्रपटाच्या इतिहासात हे गाणे सर्वात चांगले क्लासिक विनोदी गाणे ठरले. कधी लेट-करंटचा उपयोग करून कधी सौम्य शब्दातील मऊ फटकाऱ्याने विनोद साधता येतात.

मेहमूद या कलाबाजीत तरबेज होते. 'देखा ना हाय रे सोचाना...' १९७२ साली 'बॉम्बे टू गोवा' या स्वनिर्मित चित्रपटात नवोदित अमिताभ बच्चन यांना मौका देऊन पहिल्यांदा नायक म्हणून प्रदर्शित केले. 'ना बिबी ना बच्चा... सबसे बडा रुपय्या...' कन्नड फिल्म 'कमीद्रे कैलासा'वर आधारित १९७६ साली मेहमूद यांनी 'सबसे बडा रुपय्या' हा विनोदी फार्स चित्रित केला. मेहमूद यांचे वडील मुमताज अली यांचाही समावेश नृत्यात केला. अभिनव पद्धतीचे हे गाणे सर्वश्रुत झाले. १९६६ सालचा 'प्यार किये जा' हा चित्रपट मेहमूद व ओमप्रकाश यांच्या खालील दीर्घ विनोदी संभाषणासाठीही लक्षात राहतो.

दोन्ही विनोदवीरांनी कळस गाठला. मेहमूद त्यांचे वडील ओमप्रकाशला त्यांच्या सिनेमाची कथा सांगतात... मेरी कहानी बहुत डरावनी है। (भुतांचा आवाज काढतात) दूर से तुफानी हवा चिरती जा रही। लंबासा कोई चल के आ रहाऽऽ टॉकऽ टॉकऽऽ छोटी छोटी बटन जैसी आँखे। लंबीसी नाक, जैसे मुर्दा चल के आ रहा। साया मेंढक बना (मेंढक की आवाज) दरवाजा आपसूकही खुल गया, अंदर लडकी, आधी चुडेल।। वगैरे. ओम प्रकाश यांनी घाबरण्याचा व मेहमूद यांनी घाबरविण्याचा अभिनय अप्रतिम, अफलातून! मेहमूद यांनी अंगभूत तालासह विनोद निर्मिती केली. सोबत ते कथक नर्तकही होते. २९ सप्टेंबर १९३२ रोजी मेहमूद अली यांचा जन्म झाला. प्रसिद्ध कथक नर्तक व अभिनेते मुमताज अली हे त्यांचे वडील तर प्रसिद्ध नृत्यांगना मिनू मुमताज त्यांची बहीण होते. मीनाकुमारी यांच्या भगिनी मधुसोबत त्यांचा पहिला विवाह झाला. तो फार काळ टिकला नाही. १९६७ साली ट्रेसी नामे अमेरिकन मुलीशी दुसरा विवाह केला. १९४२ साली 'किस्मत' चित्रपटात बालकलाकार होते. छोट्या-मोठ्या भूमिका केल्या. १९५८ सालच्या 'परवरीश' व १९५९ सालच्या 'छोटी बहेन' चित्रपटापासून खरी ओळख निर्माण झाली. १९६० च्या सुमारास स्वतःचे प्रॉडक्शन सुरू केले. 'छोटे नवाब' पहिला चित्रपट काढला.

आर. डी. बर्मन यांचा पण संगीतकार म्हणून हा पहिला चित्रपट होता. मेहमूद यांनी सुमारे ३०० हून अधिक चित्रपटात नायकापासून तर सर्व प्रकारच्या भूमिका केल्या. ते निर्माते, निर्देशक व अभिनेते होते; तरी खरी ओळख विनोदी कलाकार म्हणून झाली. बॉलिवूडमधील सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार म्हणून त्यांना मानतात. त्यांना पाच चित्रपटात फिल्म फेअर पुरस्कार मिळाला व १९ चित्रपटात नामांकन होते. १९६६ सालचा 'दुष्मन दुनिया का' हा शेवटला दिग्दर्शक म्हणून चित्रपट होता. विनोदाला चित्रपटात उच्च स्थान मिळवून देणारे सर्वोत्कृष्ट हास्य कलाकार मेहमूद अली २३ जुलै २००४ रोजी अमेरिकेतील पेनसिल्वानिया येथे पैगंबरवासी झाले व चित्रपटसृष्टीतील हास्य निमाले.

**रमेश पोफळी**

# 'लुक्खे'चा धमाकेदार ट्रेलर रिलीज!

'लुक्खे' या नव्या वेब सिरीजचा ट्रेलर रिलीज झाला असून प्रेक्षकांमध्ये चांगलीच उत्सुकता निर्माण झाली आहे. क्राइम, ड्रग्स, म्युझिक आणि बदला या विषयांवर आधारित ही सिरीज ॲक्शन आणि थ्रिलने भरलेली आहे. या सिरिजमध्ये राशी खन्ना, पलक तिवारी, किंग, लक्षवीर सिंग सरन आणि शिवांकित सिंग यांसारखे कलाकार मुख्य भूमिकेत दिसत आहेत. ट्रेलरमध्ये सुरुवातीला एक आवाज ऐकू येतो, म्युझिकमुळे प्रसिद्धी मिळेल, तर दुसरा आवाज म्हणतो, ड्रग्समुळे पैसा आणि सत्ता मिळेल. या दोन वेगवेगळ्या विचारसरणींमधील संघर्ष हळूहळू मोठ्या गुन्हेगारीकडे वळताना दिसतो. या संघर्षातूनच बदला, हिंसा आणि अंडरवर्ल्डची कथा उलगडत जाते. या सिरिजमध्ये राशी खन्ना पोलिस अधिकार्याच्या भूमिकेत दिसत आहे. 'गुरबानी' नावाच्या या पात्राच्या माध्यमातून ती ड्रग्स रॅकेटचा पर्दाफाश करण्यासाठी लढताना दिसते. तिचा खाकी वर्दीतील लूक आणि ॲक्शन सीन प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतात. दुसरीकडे, पलक तिवारी आणि किंग यांची जोडीही ट्रेलरमध्ये ठळकपणे दिसते. किंग या सिरीजद्वारे अभिनय क्षेत्रात पदार्पण करत असून तो 'एमसी बदनाम' या रॅपरच्या भूमिकेत आहे. 'लुक्खे' ही म्युझिकल ॲक्शन ड्रामा सिरीज असल्यामुळे प्रत्येक सीनमध्ये संगीताची खास साथ जाणवते. रॅप म्युझिक, कॉन्सर्ट्स आणि त्यातून उभा राहणारा संघर्ष यामुळे ही कथा अधिक रंगतदार झाली आहे. किंग आणि 'एमसी ओजी' यांच्यातील संघर्ष ही सिरीजची मुख्य बाजू आहे. या दोन पात्रांमधील स्पर्धा आणि अहंकारामुळे गुन्हेगारीला खतपाणी मिळते. ही सिरीज चंदीगडच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. शहरी जीवनशैली, तरुणाईची स्वप्नं आणि त्याच वेळी वाढत चाललेली गुन्हेगारी यांचा संघर्ष यात दाखवण्यात आला आहे. ड्रग्स, बंदुका, रॅप कॉन्सर्ट्स आणि प्रेमकथा अशा विविध घटकांचा संगम या सिरीजमध्ये पाहायला मिळतो. त्यामुळे प्रेक्षकांना एकाच वेळी ॲक्शन, रोमांस आणि थ्रिलचा अनुभव मिळणार आहे. या सिरीजचे दिग्दर्शन हिमांक गौर यांनी केले असून निर्मिती विपुल डी. शाह आणि राजेश बहल यांनी केली आहे. 'ऑप्टिमिस्टिक्स एंटरटेनमेंट' आणि 'व्हाइट गोरिल्ला एलएलपी' यांच्या बॅनरखाली ही सिरीज तयार करण्यात आली आहे. 'रॅप आणि बदला, दोन्ही लाऊड आहेत' अशी या सिरीजची टॅगलाइन आहे, जी कथेला अगदी साजेशी वाटते. 'लुक्खे' ही वेब सिरीज ८ मे २०२६ रोजी प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. दमदार संवाद, वेगवान कथा आणि आकर्षक म्युझिकमुळे ही सिरीज प्रेक्षकांना आवडेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# 'पेड्डी'मध्ये श्रुतीचा धमाकेदार डान्स

दक्षिणात्य सुपरस्टार राम चरण याचा आगामी 'पेड्डी' हा सिनेमा सध्या जोरदार चर्चेत आहे. चित्रपट रिलीज होण्यापूर्वीच त्यातील एका खास गाण्याने सगळ्यांचे लक्ष वेधले आहे. कारण या गाण्यात श्रुती हासन स्पेशल डान्स करताना दिसणार आहे. आणि त्यासाठी तिने तब्बल ३ कोटी रुपये मानधन घेतल्याची चर्चा रंगली आहे. 'पेड्डी'मधील हा डान्स खूप भव्य पद्धतीने शूट करण्यात आला आहे. हैदराबादमध्ये खास मोठा सेट उभारण्यात आला असून, या गाण्याच्या शूटिंगसाठी श्रुती हासनने ४ दिवस दिले. कमी कालावधीत शूट होणाऱ्या या गाण्यासाठी इतकी मोठी फी घेतल्यामुळेच सध्या हा विषय चर्चेचा ठरला आहे. या गाण्याला आणखी खास बनवणारी गोष्ट म्हणजे संगीत. प्रसिद्ध संगीतकार ए आर रहमान यांनी या गाण्याला संगीत दिले आहे. त्यामुळे गाणं केवळ व्हिज्युअल्समुळेच नाही, तर संगीतामुळेही मोठं हिट ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. चित्रपटातील हे गाणं प्रेक्षकांसाठी मोठं आकर्षण ठरणार आहे. राम चरण आणि श्रुती हासन ही जोडी याआधीही एकत्र झळकली आहे आणि त्यांच्या केमिस्ट्रीला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला होता. त्यामुळे 'पेड्डी'मधील त्यांचा हा हाय- एनर्जी डान्स चाहत्यांसाठी खास ठरणार आहे. चित्रपटाच्या स्टारकास्टबद्दल बोलायचं झालं तर, या सिनेमात जान्हवी कपूर मुख्य भूमिकेत दिसणार आहे. तिची निवड ही चिरंजीवी यांच्या शिफारशीवर झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे या चित्रपटाकडून प्रेक्षकांच्या अपेक्षा अधिक वाढल्या आहेत. 'पेड्डी' हा सिनेमा २५ जून रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. विशेष म्हणजे त्याच दिवशी अक्षय कुमार याचा 'वेलकम टू द जंगल' हा सिनेमा देखील रिलीज होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर मोठी टक्कर पाहायला मिळू शकते. राम चरणचा मागील 'गेम चेंजर' हा सिनेमा अपेक्षेप्रमाणे चालला नव्हता. त्यामुळे 'पेड्डी'कडून त्याला आणि त्याच्या चाहत्यांना मोठ्या अपेक्षा आहेत.






# 'दृश्यम ३' लवकरच सिनेमागृहात

'दृश्यम ३' हा बहुप्रतीक्षित चित्रपटापैकी एक आहे. तर या चित्रपटाच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. हा चित्रपट प्रदर्शनासाठी आता सज्ज झाला असून २१ मे रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. तर या चित्राच्या निर्मात्यांनी चित्रपटाचे बजेटही जाहीर केले असून, त्यासाठी आधीच १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला आहे. मोहनलाल अभिनीत हा 'दृश्यम ३' बहुचर्चित चित्रपट आहे. तर आता पेन स्टुडिओने इंस्टाग्रामवर मनोरंजन क्षेत्रातील आपल्या पुढील उपक्रमाची घोषणा केली आहे. त्यांनी मोहनलाल अभिनीत 'दृश्यम ३' साठी पॅनोरामा स्टुडिओमार्फत आशीर्वाद सिनेमामध्ये १०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा केली. या घोषणेत म्हटले आहे, पेन स्टुडिओ मोहनलाल अभिनीत 'दृश्यम ३' साठी पॅनोरामा स्टुडिओमार्फत आशीर्वाद सिनेमामध्ये १०० कोटी रुपयांची गुंतवणूक करेल. तर या आता पोस्टला अनेकजण प्रतिसाद दिले आहे. आणि अभिनंदन केले आहे. तर या चित्रपट्याच्या चाहत्यासाठी चित्रपटाची डेट रीलीज केल्याने ही एक आंनदाची बातमी ठरली आहे. 'दृश्यम' चित्रपटाचा आता पर्यतचा रीजल्ट पाहता तो उत्तमच ठरला आहे. तर दोन्ही भाग सुपरहिट ठरले. तसेच त्यांना प्रेक्षकांकडून प्रचंड प्रेम मिळाले. इतकेच नाही, तर अनेक दिग्दर्शकांनी ही कथा त्यांच्या प्रादेशिक भाषांमध्ये रूपांतरित केली आहे. बॉलिवूडमध्ये, अजय देवगणचा 'दृश्यम' बॉक्स ऑफिसवर हिट ठरला होता. आता, मोहनलाल अभिनीत 'दृश्यम ३' २१ मे रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यासाठी सज्ज आहे. तर या चित्रपटाला लोकांचा प्रतिसाद कसा राहिल आणि बॉक्स ऑफिसवर कमाई किती होईल हे पाहण्यासारखे राहील.



# यशच्या 'टॉक्सिक'चं प्रदर्शन टळलं

बॉलिवूड गीतू मोहनदास यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला हा चित्रपट आधी १९ मार्च २०२६ रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र, त्यावेळी बॉक्स ऑफिसवर 'धुरंधर २' सोबत होणारी टक्कर टाळण्यासाठी प्रदर्शनाची तारीख ४ जून निश्चित करण्यात आली होती. आता यशने स्पष्ट केले आहे की, ४ जून रोजी देखील हा चित्रपट चित्रपटगृहात येणार नाही. विशेष म्हणजे, यावेळी नवीन रिलीज डेटबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे चाहत्यांची आणखी निराशा झाली आहे.

चित्रपटाचा अभिनेता आणि सह-निर्माता असलेल्या यशने एका सविस्तर निवेदनात म्हटले आहे की, काही चित्रपट आपण बनवतो आणि काही चित्रपट आपल्याला सिनेमावर प्रेम का करावे, याची आठवण करून देतात. 'टॉक्सिक'चा प्रवासही असाच राहिला आहे. उळपशारउप मध्ये आमचा चित्रपटाला जगभरातून जो प्रतिसाद मिळाला, त्यावरून आमचा यावरचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. याशिवाय हा चित्रपट जागतिक स्तरावरील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी पात्र आहे, याचीही आम्हाला खात्री वाटतेय. तो पुढे म्हणाला, 'टॉक्सिक'चे काम आता पूर्ण झाले आहे. सध्या आम्ही जागतिक स्तरावर वितरण आणि पार्टनरशिपला अंतिम स्वरूप देत आहोत. त्यामुळेच आम्ही प्रदर्शनाची तारीख बदलण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही ४ जूनला चित्रपट प्रदर्शित करणार नाही. याशिवाय जागतिक सिनेसृष्टीच्या बाजाराचा विचार करून लवकरच एका नवीन तारखेची घोषणा करू. 'टॉक्सिक' हा एक पीरियड गँगस्टर ड्रामा असून यात यश दुहेरी भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचे बजेट तब्बल ७०० ते ८०० कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे, ज्यामुळे हा आतापर्यंतचा सर्वात महागडा भारतीय चित्रपट ठरणार आहे. चित्रपटात यशसोबत कियारा अडवाणी, नयनतारा, हुमा कुरेशी, तारा सुतारिया आणि रुक्मिणी वसंत अशी तगडी स्टारकास्ट आहे. याआधी जेव्हा 'टॉक्सिक'चे १९ मार्चचे प्रदर्शन पुढे गेले होते, तेव्हा निर्मात्यांनी इराण-इस्रायल युद्धाचा संदर्भ देत आखाती देशांमधील बिघडलेल्या परिस्थितीचे कारण दिले होते. मात्र, यावेळी प्रदर्शनाची तारीख का लांबणीवर टाकली, याचे कोणतेही विशेष असे ठोस कारण देण्यात आलेले नाही. यशने केवळ 'जागतिक स्तरावर मोठा प्रभाव पाडण्यासाठी वेळ हवा आहे' असे म्हटले आहे.



## मृणालचा 'डकैत' लवकरच ओटीटीवर

मृणाल ठाकूरचा 'डकैत' सिनेमा थिएटरमध्ये प्रदर्शित होताच, ओटीटीवर येण्याची चर्चा सुरू झाली आहे. १० एप्रिल रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर अपेक्षित यश मिळाले नाही. तरीही आता ओटीटीवर तो कसा प्रतिसाद मिळवतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मृणाल खूप लोकप्रिय झाली आहे. तिचा प्रवास टेलिव्हिजनपासून सुरू झाला. 'कुमकुम भाग्य' या मालिकेत तिने साकारलेली बुलबुल ही भूमिका प्रेक्षकांना खूप आवडली होती. त्यानंतर तिने सिनेमात पाऊल ठेवले आणि 'सीता रामम', 'सुपर ३०', 'जर्सी', 'लस्ट स्टोरीज २' यांसारख्या चित्रपटांतून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. 'डकैत' या सिनेमात तिच्यासोबत आदिवी शेष मुख्य भूमिकेत दिसतो. याशिवाय प्रकाश राज आणि अनुराग कश्यप यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. दमदार कलाकार असूनही हा सिनेमा थिएटरमध्ये फारसा गाजू शकला नाही. 'डकैत' हा सिनेमा ८ मे २०२६ रोजी ओटीटीवर रिलीज होण्याची शक्यता आहे. मात्र, याबाबत अजून अधिकृत घोषणा झालेली नाही. विशेष म्हणजे हा चित्रपट एकाचवेळी तेलुगु, तमिळ, कन्नड, मल्याळम आणि हिंदी या भाषांमध्ये उपलब्ध होणार आहे. ओटीटी प्लॅटफॉर्मबद्दल मात्र अजूनही स्पष्टता नाही. सुरुवातीला 'प्राईम व्हिडिओ'कडे या चित्रपटाचे डिजिटल हक्क असल्याची चर्चा होती. पण निर्मात्यांकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे चाहते अधिकृत घोषणेची वाट पाहत आहेत. बॉक्स ऑफिसबद्दल बोलायचे झाल्यास, 'डकैत'ने भारतात ४२ कोटींची कमाई केली आहे, तर जगभरात हा आकडा ५४ कोटींवर पोहोचला आहे. ही कमाई ठीकठाक असली तरी मृणालच्या लोकप्रियतेच्या मानाने अपेक्षा जास्त होत्या. आता मात्र चित्रपटाचा खरा कस लागणार आहे तो ओटीटीवर. कारण अनेक चित्रपट थिएटरमध्ये यशस्वी ठरत नाहीत, पण ओटीटीवर मोठा प्रतिसाद मिळवतात. 'डकैत'लाही अशीच संधी मिळणार आहे.



## 'या' बायोपिकमध्ये दिसणार देसी

जागतिक स्तरावर भारताचे नाव उंचावणारी अभिनेत्री प्रियंका चोप्रा सध्या यशाच्या शिखरावर आहे. हॉलिवूडमध्ये स्वतःचे स्थान निर्माण केल्यानंतर आता प्रियंका पुन्हा एकदा बॉलिवूडमध्ये धुमाकूळ घालण्यासाठी सज्ज झाली आहे. एस.एस. राजामौली यांच्या 'वाराणसी' या चित्रपटानंतर आता प्रियंकाच्या हाती एक मोठा बायोपिक लागला आहे. वृत्तानुसार, प्रियंका प्रसिद्ध भारतीय- हंगेरियन चित्रकार अमृता शेरगिल यांच्या जीवनावर आधारित 'अमरी' या बायोपिकमध्ये झळकणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाचे दिग्दर्शन भारतीय- अमेरिकन चित्रपट निर्मात्या मीरा नायर करत आहेत. प्रियंका आणि मीरा नायर पहिल्यांदाच या प्रोजेक्टच्या निमित्त-ाने एकत्र काम करत आहेत. या चित्रपटात प्रियंका मुख्य भूमिकेत नसून एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. अमृता शेरगिल यांची मुख्य भूमिका अभिनेत्री तान्या मानिकतला ही अभिनेत्री साकारत आहे. मात्र, कथानकातील एका अशा विशिष्ट भूमिकेसाठी मीरा नायर यांना प्रियंकाच हवी होती. यासाठी त्यांनी गेल्या वर्षीच प्रियंकाची भेट घेतली होती. या चित्रपटाचे शुटिंग हे भारत, हंगेरी आणि फ्रान्स अशा विविध देशांमध्ये होणार आहे. प्रियंकाने हैदराबादमध्ये महेश बाबूच्या 'वाराणसी' चित्रपटाचे शुटिंग पूर्ण केले. निर्मात्यांनी प्रियंकाच्या भूमिकेबद्दल कमालीची गुप्तता पाळली आहे. जवळपास ६ वर्षांनंतर प्रियंका हिंदी चित्रपटांत कमबॅक करत असल्याने तिचे चाहते तिला पुन्हा एकदा पडद्यावर पाहण्यासाठी कमालीचे उत्सुक आहेत.



## काजोलने ३० वर्षांनंतर मोडली 'नो-किसिंग पॉलिसी'

बॉलीवूड अभिनेत्री काजोल गेली तीन दशकांहून अधिक काळ हिंदी चित्रपटसृष्टीत काम करत आहे. तिने 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे', 'कुछ कुछ होता है', 'कभी खुशी कभी गम' असे अनेक गाजलेले चित्रपट दिले आहेत ज्यांची क्रेझ आजही कमी झालेली नाही. काजोलने या ३० वर्षांच्या कारकिर्दीत सलमान खानप्रमाणेच 'नो-किसिंग पॉलिसी' पाळली होती आणि कोणत्याही सहकलाकाराला पडद्यावर कधी किस केलं नव्हतं. मात्र, ओटीटीवर आल्यानंतर काजोलने बोल्ड अंदाजात हा नियम मोडला. यामागचं कारणही तिने आता सांगितलं आहे. काजोलने २०२३ मध्ये 'द ट्रायल: प्यार, कानून और धोखा' या सीरिजमधून ओटीटी विश्वात पदार्पण केलं. या सीरिजमध्ये तिने सहकलाकार जीशु सेनगुप्ताबरोबर लिपलॉक सीन दिला होता. आता स्वतःच बनवलेला हा नियम मोडण्याचा निर्णय तिने का घेतला, याबद्दल काजोलने सांगितलं आहे. काजोल 'नो-किसिंग पॉलिसी' मोडण्याबाबत म्हणाली, खरं सांगायचं तर त्या पात्राशी संबंधित अनेक गोष्टी मला करायच्या होत्या. तो फक्त एक किस नव्हता, तर ती काय विचार करत होती, तिला काय हवं होतं आणि तिच्याबरोबर काय घडलं नाही, याचाही तो भाग होता. तिचा विश्वास, तिची श्रद्धा या सगळ्या गोष्टी त्या पात्राचा भाग होत्या. काजोलला जेव्हा तिच्यामध्ये आता बदल झालाय का आणि किसिंग सीन देण्यासाठी कम्फर्टेबल आहे का? असं विचारण्यात आलं तेव्हा अभिनेत्री म्हणाली, मी त्या गोष्टीबाबत खूप अस्वस्थ होते. कल्पना मला आवडली होती, पण मी हे करू शकेन की नाही, किंवा 'कट' म्हणावं लागेल का, याची खात्री नव्हती. पण नंतर मला जाणवलं की हे खूप साधं आहे. हा एक व्यावसायिक निर्णय होता, जिथे मला वाटलं की आज मी हा निर्णय घेऊ शकते. काजोलने शेवटी अभिनेत्री म्हणून घेतलेल्या निर्णयांबद्दल तिला पश्चात्ताप नसल्याचंही म्हटलं आहे. तरुण अभिनेत्री म्हणून करिअरची सुरुवात करतानाच मला काय हवं आहे, हे मला स्पष्टपणे माहीत होतं असंही तिने सांगितलं.